# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

संध्या सोमवार, दि. १ ऑगस्ट २०१६ | ८

### युवकांनी विज्ञानवादी जीवनदृष्टी अंगिकारावी : भास्कर सदाकळे



राजगुरुनगर/किरण खुडे

विज्ञान हे शिकण्यापुरते मर्यादित न राहता ते प्रत्यक्ष जीवनातून व्यक्त व्हावे यासाठी महाविद्यालयीन युवकांनी विज्ञानवादी जीवनदृष्टी अंगिकारण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विज्ञान बोधवाहिनीचे सहकार्यवाह भास्कर सदाकळे यांनी येथे व्यक्त केले ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व अंधश्रद्धा निर्मूलन समिती खेड शाखा यांच्या वतीने आयोजित केलेल्या प्रबोधनपर कार्यक्रमात वैज्ञानिक दृष्टीकोन व युवक या विषयावर बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, अंनिसच्या पुणे जिल्हा कार्याध्यक्ष नंदिनी जाधव, अंनिसचे राज्य सांस्कृतिक योगेश कुदळे, ॲड. साधना बाजारे, नवनाथ लोंढे, मनोहर शेवकरी, विशाल बारवकर, प्रा. अतुल सवाखंडे, वर्षा चौधरी, डॉ महेश घाडगे आणि प्रथम वर्ष कला व विज्ञान शाखेतील विदयार्थी उपस्थित होते.

भास्कर सदाकळे बोलताना पुढे म्हणाले की, आपण विज्ञानाने प्रगत झालेली सृष्टी घेतली मात्र दृष्टी घेतली नाही त्यामुळे समाजात करणी, भूत, भानामतीच्या नावाखाली फसवणुक केली जाते. अशा फसवणूक करणाऱ्या बाबा - बुआ विरुध्द जादुटोणा कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करता येतो. हातचलाखी, विज्ञान व तंत्राच्या साहाय्याने बाबा – बुआ चमत्कार करतात. विद्यार्थ्यांनी चिकित्सक दृष्टीकोन ठेऊन प्रत्येक गोष्ट तपासायला हवी असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी त्यांनी जिभेतून आरपार त्रिशुळ काढणे, हातातून कुंकू काढणे, लोखंडी कडीचा प्रयोग इत्यादी प्रात्याक्षिके सादर केली. तसेच नंदिनी जाधव यांनी जिभेवर जळता कापूर ठेवणे, कुंकवाची करणी करणे, नारळातून करणी काढणे इत्यादी प्रात्याक्षिके करुन दाखवली.

योगेश कुदळे व सहकारी यांनी अभिवादन गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस. बी. पाटील यांनी, सूत्रसंचालन डॉ संजय शिंदे यांनी तर आभार डॉ ए. एम. पवार यांनी केले.

सकाळ
७



# राजगुरू महाविद्यालयात विज्ञानावर व्याख्यान

लोकमत पुणे, शनिवार, दि. ३० जुलै २०१६. ४

# विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टी अंगीकारावी : सदाकळे

केसरी पुणे, २ ऑगस्ट २०१६/३

# युवकांनी विज्ञानवादी दृष्टिकोन अंगीकारावा : सदाकळे



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात प्रबोधनपर व्याख्यान करताना अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे भास्कर सदाकळे. (छायाचित्र – किरण खुडे)

राजगुरुनगर (वार्ताहर) : विज्ञान हे शिकण्यापुरते मर्यादित न राहता ते प्रत्यक्ष जीवनातून व्यक्त व्हावे यासाठी महाविद्यालयीन युवकांनी विज्ञानवादी जीवनदृष्टी अंगीकारावी, असे प्रतिपादन भास्कर सदाकळे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व अंधश्रद्धा निर्मूलन समिती खेड शाखा यांच्या वतीने आयोजित केलेल्या प्रबोधनपर कार्यक्रमात 'वैज्ञानिक दृष्टिकोन व युवक' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, अंनिसच्या पुणे जिल्हा कार्याध्यक्ष नंदिनी जाधव, अंनिसचे राज्य सांस्कृतिक योगेश कुदळे, ॲड. साधना बाजारे, नवनाथ लोंढे, मनोहर शेवकरी, विशाल बारवकर, प्रा. अतुल सवाखंडे, वर्षा चौधरी, डॉ. महेश धाडगे आणि प्रथम वर्ष कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, आपण विज्ञानाने प्रगत झालेली सृष्टी घेतली, मात्र दृष्टी घेतली नाही. त्यामुळे समाजात करणी, भूत, भानामतीच्या नावाखाली फसवणूक केली जाते. अशी फसवणूक करणाऱ्या भोंदूबाबाविरुध्द जादुटोणा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करता येतो. विद्यार्थ्यांनी चिकित्सक दृष्टिकोन ठेवून प्रत्येक गोष्ट तपासायला हवी असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी त्यांनी जिभेतून आरपार त्रिशूळ काढणे, हातातून कुंकू काढणे, लोखंडी कढीचा प्रयोग इत्यादी प्रात्यक्षिके सादर केली. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी, तर आभार डॉ. ए. एम. पवार यांनी मानले.

५ ते ११ ऑगस्ट २०१६/२

खेड टाइम्स

# युवकांनी विज्ञानवादी जीवनदृष्टी अंगीकारावी - भास्कर सदाकळे

राजगुरुनगर, (प्रतिनिधी) - विज्ञान हे शिकण्यापुरते मर्यादित न राहता ते प्रत्यक्ष जीवनातून व्यक्त व्हावे यासाठी महाविद्यालयीन युवकांनी विज्ञानवादी जीवनदृष्टी अंगिकारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विज्ञान बोधवाहिनीचे सहकार्यवाह भास्कर सदाकळे यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व अंधश्रद्धा निर्मूलन समिती खेड शाखा यांच्या वतीने आयोजित केलेल्या प्रबोधनपर कार्यक्रमात 'वैज्ञानिक दृष्टीकोन व युवक' या विषयावर बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, 'अंनिस'च्या पुणे जिल्हा कार्याध्यक्ष नंदिनी जाधव, अंनिसचे राज्य सांस्कृतिक योगेश कुदळे, अॅड. साधना बाजारे, नवनाथ लोंढे, मनोहर शेवकरी, विशाल बारवकर, प्रा. अतुल सवाखंडे, वर्षा चौधरी, डॉ. महेश थाडगे आणि प्रथम वर्ष कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

भास्कर सदाकळे बोलताना पुढे म्हणाले की, आपण विज्ञानाने प्रगत झालेली सृष्टी घेतली; मात्र दृष्टी घेतली नाही त्यामुळे समाजात करणीभूत, भानामतीच्या नावाखाली फसवणूक केली जाते. अशा



फसवणूक करणाऱ्या बाबा-बुआविरुद्ध जादुटोणा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करता येतो. हातचलाखी, विज्ञान व तंत्राच्या साहाय्याने बाबा-बुआ चमत्कार करतात.

विद्यार्थ्यांनी चिकित्सक दृष्टीकोन ठेवून प्रत्येक गोष्ट तपासायला हवी असे आवाहन त्यांनी केले. या वेळी त्यांनी जिभेतून आरपार त्रिशूळ काढणे, हातातून कुंकू काढणे, लोखंडी कढीचा प्रयोग आदी प्रात्यक्षिके सादर केली. तसेच नंदिनी जाधव यांनी जिभेवर जळता कापूर ठेवणे, कुंकवाची करणी करणे, नारळातून करणी काढणे आदी प्रात्यक्षिके करून दाखवली.

योगेश कुदळे व सहकाऱ्यांनी अभिवादन गीत सादर केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. डॉ. ए. एम. पवार यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख